# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर | वर्ष ५ वे | अंक ३८ | शनिवार दि.०९ ऑगस्ट २०२५ | पृष्ठे ४ | स्वागत मूल्य २ रू.


## उद्धव ठाकरेंना राहुल गांधींच्या घरी मागे बसवलं? टीका करणाऱ्यांवर संजय राऊत तुटून पडले



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या दिल्ली दौऱ्यावरून राजकीय वाद पेटला आहे. ६ ते ८ ऑगस्ट २०२५ दरम्यान ठाकरे दिल्लीत होते. तिथे त्यांनी इंडिया आघाडीच्या बैठकीला हजेरी लावली आणि राहुल गांधी यांच्या निवासस्थानी सहकुटुंब भेट घेतली. मात्र, या बैठकीत उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना मागे बसवल्याचा दावा सत्ताधारी शिंदे गट आणि भाजपने केला आहे. उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राची लाज घालवली अशी जहरी टीका शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी केली.

राहुल गांधी यांच्या निवासस्थानी ७ ऑगस्ट रोजी झालेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीत निवडणुकीतील कथित घोटाळ्यांवर प्रेझेंटेशन देण्यात आले. यावेळी उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि संजय राऊत उपस्थित होते. सत्ताधाऱ्यांनी ठाकरेंना मागे बसवल्याचा फोटो शेअर करत टीका केली.

संजय राऊतांचा पलटवार संजय राऊत यांनी सणसणीत प्रत्युत्तर देत म्हटले, आम्ही राहुल गांधींच्या घरी गेलो होतो. प्रेझेंटेशनसाठी स्क्रीन समोर बसून पाहण्यात त्रास होत होता, म्हणून आम्ही मागे बसलो. ती जागा बसण्याची नव्हती, प्रेझेंटेशन पाहण्यासाठी होती. भाजपच्या फालतू लोकांनी हे समजून घ्यावं. उद्धव ठाकरे टेक्निकल गोष्टींत तज्ञ आहेत, त्यांना स्क्रीन नीट दिसावी म्हणून ते मागे गेले.

राऊत पुढे म्हणाले, राहुल गांधी आणि त्यांचे कुटुंबीय ठाकरेंच्या कुटुंबाला भेटले. त्यांनी नवीन घर दाखवले. वोट चोरीविरोधातील प्रेझेंटेशन पाहण्यासाठी प्रमुख नेत्यांना पुढे बसवले होते, पण दृष्टीकोनात अडचण येत असल्याने आम्ही मागे बसलो. यात अपमान कुठे आहे?

शिंदे गटाची टीका शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले, शिवरायांचा आणि बाळासाहेबांचा स्वाभिमान शिकवणारा वारसा उद्धव ठाकरेंनी विसरला का? काँग्रेसच्या बैठकीत शेवटच्या रांगेत बसून महाराष्ट्राची लाज घालवली. एक खासदार असलेल्या पक्षांना पुढे बसवले, मग ठाकरेंची ही अवस्था का? स्वाभिमान शिल्लक असेल तर पेटून उठा!

नरेश म्हस्के दुतोंडी गांडूळ संजय राऊत म्हणाले की, त्या म्हस्केंना सांगा, दुतोंडी गांडूळ, बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना फोडताना तुम्हाला मान-अपमान दिसले नाही का? दिल्लीत येऊन मोदी आणि शाह यांची चाटुगिरी करतात, तेव्हा तुम्हाला शिवरायांचा महाराष्ट्र दिसत नाही का? आमचे आम्ही बघून घेऊ. अविमुक्तेश्वरानंद नावाचे शंकराचार्य आहेत. जे एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना आशीर्वाद देत असतात, असं संजय राऊत म्हणाले.

## आता भारत थांबणार नाही, आपल्याकडे संपूर्ण जगाची बाजारपेठ ; ट्रम्पच्या टॅरिफ वाढीनंतर नितीन गडकरींचे मोठे विधान

आपल्याकडे संपूर्ण जगाची बाजारपेठ आहे आणि आपण वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहोत. जगात असे फार कमी देश आहेत जे कमी किमतीत चांगल्या दर्जाचे उत्पादने देत आहेत आणि भारत त्या देशांमध्ये आहे.असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. त्यांनी एका इंग्रजी वृत्तवाहिनीच्या कार्क्रमात भारतीय अर्थव्यवस्थेविषयी हे महत्वाचे विधान केले आहे. एकीकडे अमेरिकेने भारतावर अतिरिक्त टॅरिफ लावला आहे त्याच वेळी गडकरींचे हे विधान आले आहे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी, जागतिक अर्थव्यवस्थेत आपले योगदान लवकरच वाढणार आहे. आपल्याला जागतिक बाजारपेठ मिळणार आहे, ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था खूप पुढे जाईल असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला. पुढे बोलताना त्यांनी, शेती, ग्रामीण आणि जंगल यावर अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे. जर शेतीचा जीडीपीमध्ये २२ टक्के वाटा असेल, तर भारतीय अर्थव्यवस्था आपण जिथे विचार करत आहोत तिथे पोहोचू शकते असा मोठा दावा देखील त्यांनी केला.



तसेच केंद्रीय मंत्री रस्ते पायाभूत सुविधांबद्दल बोलताना म्हणाले की, आपल्या देशातील रस्ते पायाभूत सुविधांमध्ये वेगाने सुधारणा झाली आहे. ज्यामुळे लॉजिस्टिक्समध्ये मोठी सुधारणा झाली आहे. एका संशोधनाचा संदर्भ देत ते म्हणाले की, पूर्वी भारतात लॉजिस्टिक्सचा खर्च १६ टक्के होता, परंतु आता तो ६ टक्क्यांनी कमी झाला आहे. नितीन गडकरी यांनी यावेळी,जर रस्त्यांच्या पायाभूत सुविधांवर १ रुपया खर्च केला तर अर्थव्यवस्था ३ रुपयांनी वाढते. म्हणूनच, आम्ही रस्ते पायाभूत सुविधा आणखी मजबूत करत आहोत, जेणेकरून भारताच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. असे म्हटले. तसेच नितीन गडकरी यांनी,आतापर्यंत आम्ही या वर्षी देशात २.५ लाख कोटींचे काम केले आहे आणि डिसेंबर अखेरपर्यंत आम्ही १० लाख कोटींचे काम करू. असे म्हटले आहे.

त्यासोबतच,मी अमेरिकेच्या निर्णयावर भाष्य करू नये. आम्ही एका किंवा दोन देशांवर अवलंबून नाही, आमची जागतिक बाजारपेठ आहे. आमची ऑटो अनेक देशांमध्ये निर्यात केली जात आहे. ते म्हणाले की, चिप्ससारख्या गोष्टींमध्ये समस्या आहे. तथापि, आम्ही अनेक गोष्टी निर्यात करत आहोत. असे म्हणत त्यांनी काही मुद्द्यांवर बोलणे टाळले. तसेच ते म्हणाले की, भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी जागतिक बाजारपेठ उपलब्ध आहे आणि येणाऱ्या काळात आमची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल असा माझा विश्वास आहे.

## श्री भीमाशंकर बावगे यांचा वाढदिवस उत्साह संपन्न

लातूर: श्री वेताळेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर आप्पा बावगे यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर कॉलेज ऑफ फार्मसी लातूर व श्रीमती सरस्वती कराड ब्लड सेंटर लातूर यांच्या संयुक्त विद्यमानाने महाविद्यालयांमध्ये रक्तदान शिबिर,वृक्ष लागवड व पोस्टर सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे यांचा सत्कार सचिव वेताळेश्वर बावगे ,नंदकिशोर बावगे, सौ. माधुरी बावगे तसेच प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला ,प्राचार्य डॉ. वीरेंद्र मेश्राम, प्राचार्य संतोष मेदगे, प्राचार्या योगिता बावगे, प्राचार्य मुख्याध्यापक कालिदास गोरे राजशेखर चौधरी, देशमुख सर, जोशी सर यांच्या हस्ते शाल बुके व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.तसेच पोस्टर साजरीकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला



या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यानी पुढील भविष्याच्या वाटचालीसाठी उदंड आयुष्य लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना व शुभेच्छा देण्यात आले

## हर घर तिरंगा मोहीम शहरात तीन टप्प्यात विविध उपक्रमांचे आयोजन

लातूर /प्रतिनिधी :नागरिकांत देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता वाढविणे यासाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार लातूर शहरात 'हर घर तिरंगा' मोहीम राबविण्यात येणार आहे.१५ ऑगस्ट पर्यंत एकूण तीन टप्प्यात ही मोहीम राबविली जात आहे. भारताच्या राष्ट्रध्वजासोबत वैयक्तिक बंध निर्माण करण्यावर हा उपक्रम आधारित आहे. २०२२ पासून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाकडून राबविली जाणारी ही मोहीम आता लोक चळवळ बनलेली आहे.या अंतर्गत लातूर शहरात तीन टप्प्यात विविध उपक्रम होत आहेत. पहिल्या टप्प्यात शुक्रवार दि.८ रोजी सिद्धार्थ सोसायटीतील बौद्ध विहार येथे रांगोळी स्पर्धा संपन्न झाली. एलआयसी कॉलनी येथे रांगोळी स्पर्धा व प्रतिज्ञा तर मनपा मुख्यालय तिरंगा थीमवर आधारित वस्तू प्रदर्शन व विक्री सुरू आहे. दुसऱ्या टप्प्यात सोमवार दि. ११ ऑगस्ट रोजी मनपाच्या सर्व १६ शाळांमध्ये शिक्षण विभागाच्या वतीने तिरंगा रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. याशिवाय प्रश्नमंजुषा स्पर्धाही होणार आहे.मंगळवार दि. १२ ऑगस्ट रोजी तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.वाहन विभागाच्या वतीने आयोजित या रॅलीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील आंबेडकरांच्या पुतळ्यापासून प्रारंभ होणार आहे. शिवाजी चौक, राजीव गांधी चौक, परत शिवाजी चौक, गांधी चौक, गंजगोलाई, तेथून परत महानगरपालिका कार्यालयात या रॅलीचे विसर्जन होणार आहे.

बुधवार दि.१३ ऑगस्ट रोजी तिसऱ्या टप्प्यात भांडारपाल व शिक्षण विभागाच्या वतीने तिरंगा ट्रिब्यूट आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये स्वातंत्र्यसैनिक व शहीद जवानांचे स्मरण तसेच सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील नागरिकांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे.

## लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी ६.२ मिलीमीटर पावसाची नोंद

लातूर, दि. ०८ (जिमाका): जिल्ह्यात ८ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी ६.२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये चाकूर तालुक्यात सर्वाधिक १३.६ मिलीमीटर, तर शिरूर अनंता तालुक्यात सर्वात कमी २.४ मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे- लातूर- २.७, औसा- ३.१, अहमदपूर- ९.७, निलंगा- ६.५, उदगीर- ९.७, चाकूर- १३.६, रेणापूर- ३.२, देवणी- २.९, शिरूर अनंतपाळ- २.४ आणि जळकोट- ८.९ मिलीमीटर.

## बालयोगिणी मुक्तीनाथ श्रीनाथ गुरूयोगिणी महेश्वरीनाथ यांचा कव्हेकर परिवाराच्यावतीने सत्कार

लातूर दि.०८-०८-२०२५ हिमायतनगर तालुक्यातील टाकराळा येथील श्रीनाथ मढी तपोवन संस्थानच्या साध्वी तथा झी टॉकीज फेम शिवकथावाचक बालयोगिणी मुक्तीनाथ श्रीनाथ गुरूयोगिणी महेश्वरीनाथ यांनी लातूर येथे विश्वेश्वर मंदिर, मंठाळे नगर येथे ०३ ऑगस्ट ते १० ऑगस्ट २०२५ या दरम्यान सुरू असलेल्या शिवमहापुराण कथेसाठी आलेल्या साध्वी यांनी मजगे नगर येथील कैलास निवासस्थानी भेट दिली असता त्यांचा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर व आदितीताई अजित पाटील कव्हेकर यांच्याहस्ते विठ्ठल-रूक्मिणीची मूर्ती, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



यावेळी साध्वी शिवकथावाचक बालयोगिणी मुक्तीनाथ श्रीनाथ गुरूयोगिणी महेश्वरीनाथ यांच्याशी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी आध्यात्मिक व धार्मिक विधी विषयक सविस्तर चर्चा केली. तसेच विश्वेश्वर मंदिर, मंठाळे नगर येथे ०३ ऑगस्ट ते १० ऑगस्ट २०२५ या दरम्यान सुरू असलेल्या शिवमहापुराण कथा ऐकण्यासाठी आलेल्या भाविकांसाठी मोठी पर्वणी असल्याचेही त्या म्हणाल्या.

यावेळी भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, सौ.अनिता कदम, माजी प्राचार्य दिगंबर शेटे, राजकुमार शेटे आदी उपस्थित होते.

## ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे विविध मागण्यासाठी लातूर जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन

लातूर : अभय यावलकर समितीच्या शिफारशी लागू करा, किमान वेतनातील ३५ महिन्याचा वाढीव फरक बिल अदा करावे, किमान वेतनाची कमिटी बसवून वेतनाचेनवीन दर लागू करावे, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी असणारीउत्पन्न आणि वसुलीची अट रद्द करावी या अन्य मागण्यासाठी महाराष्ट्र राज्यग्रामपंचायत कर्मचारी महासंघाच्या वतीने आज ८ ऑगस्ट रोजी पासून लातूरजिल्हा परिषदेसमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरु केले आहे. ग्रामपंचायतकर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष हणमंत कांबळे यांच्या नेतृत्वाखाली हेआंदोलन करण्यात येत आहे.मुख्यमंत्री फडणवीस हे लातूर दौऱ्यावर येत आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतकर्मचाऱ्यांच्या या धरणे आंदोलनाला महत्व आले आहे. या आंदोलनातमहाराष्ट्र राज्य




ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष कॉ. हणमंतकांबळे, जिल्हा सचिव कॉ. रामकिसन कुंटेवाड, मार्गदर्शक कॉ. ज्ञानदेवपवार, सुरेश काटे, रेणापूर, भागवत सूर्यवंशी औसा, कालिदास कांबळे, दिलीपपांचाळ जळकोट, बळीराम गिरी औसा आदिसह जिल्हातील ग्रामपंचायत कर्मचारीमोठ्या संख्येने उपस्थित आहेत.

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध एकवटले १३ न्यायाधीश ; म्हणाले,अनावश्यक टिपण्णी ..

देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अलिकडच्या आदेशाविरुद्ध अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या १३ न्यायाधीशांनी मोर्चा उघडला आहे. या न्यायाधीशांनी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अरुण भन्साळी यांना पत्र लिहून पूर्ण न्यायालय बैठक बोलावण्याची मागणी केली आहे. हे पत्र सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, जरी अद्याप त्याची अधिकृतपणे पुष्टी झालेली नाही. संपूर्ण प्रकरण काय आहे? सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती जे.बी. पार्डीवाला आणि न्यायाधीश न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने ४ ऑगस्ट २०२५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती प्रशांत कुमार यांच्याविरुद्ध कठोर भूमिका घेतली आणि त्यांना निवृत्तीपर्यंत फौजदारी खटल्यांच्या सुनावणीपासून दूर करण्याचे आदेश दिले. तसेच, त्यांना वरिष्ठ आणि अनुभवी न्यायाधीश असलेल्या खंडपीठात काम करण्याचे निर्देश देण्यात आले. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती प्रशांत कुमार यांनी दिवाणी वादांमध्ये पैसे वसूल करण्यासाठी पर्याय म्हणून फौजदारी खटल्यांचा वापर करता येईल असे म्हटले होते, त्यानंतर हे निर्देश देण्यात आले. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची भूमिका व्हायरल पत्रात, अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या १३ न्यायाधीशांनी न्यायमूर्ती प्रशांत कुमार यांच्या समर्थनार्थ लिहिले आहे की ४ ऑगस्टचा आदेश सूचना न देता जारी करण्यात आला आणि विद्वान न्यायाधीश यांच्याविरुद्ध अनावश्यक कठोर टिप्पणी करण्यात आली. न्यायाधीशांनी पूर्ण न्यायालयाच्या बैठकीत असा ठराव मंजूर करावा की सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशाचे पालन केले जाऊ नये, कारण सर्वोच्च न्यायालयाला उच्च न्यायालयावर प्रशासकीय देखरेखीचा अधिकार नाही. तसेच, पूर्ण न्यायालयाने आदेशाच्या स्वर आणि



भावनेविरुद्ध आपला आक्षेप नोंदवावा. एका आरोपीने समन्स रद्द करण्यासाठी अलाहाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली तेव्हा हा खटला सुरू झाला. आरोपीने असा युक्तिवाद केला की हा एक दिवाणी वाद आहे. ५ मे २०२५ रोजी उच्च न्यायालयाच्या एका न्यायाधीशाने सर्वोच्च न्यायालयाच्या जुन्या निर्णयांचा हवाला देत याचिका फेटाळून लावली. यानंतर, खरेदीदाराने संविधानाच्या कलम १३६ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयात अपील केले. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय ४ ऑगस्ट २०२५ रोजी, सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाचा ५ मे रोजीचा आदेश रद्द केला आणि प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी दुसऱ्या न्यायाधीशांकडे पाठवले. तसेच, सर्वोच्च न्यायालयाने न्यायमूर्ती प्रशांत कुमार यांच्याविरुद्ध कडक टिप्पणी केली आणि म्हटले की, उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाच्या न्यायाधीशांविरुद्ध टिप्पणी करताना संयम बाळगावा, कारण न्यायाधीश न्यायालयात उपस्थित नसतात आणि त्यांची बाजू मांडू शकत नाहीत.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## भारतीय बाजाराची सक्षमता

भारतीय शेअर बाजार आंतरराष्ट्रीय दबावांना, प्रतिकूल बदलांना कशाप्रकारे यशस्वी तोंड देऊ शकतो, हे आता अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नव्या टॅरिफ (जकात दर) परिणामातून स्पष्ट झाले. भारतीय बाजारातून अमेरिकेला निर्यात होणार्या वस्तूंवर आता २५ टक्क्यांऐवजी ५० टक्के कर द्यावा लागेल. या बातमीचा परिणाम म्हणून भारतीय शेअर बाजार प्रचंड प्रमाणात घसरेल, असा अंदाज होता. प्रत्यक्षात मात्र नेहमीच्या चौकटीत ३०० ते ५०० अंकांतच बाजार प्रारंभी राहिला. भारतीय शेअर बाजाराची ही आर्थिक सक्षमता किंवा प्रतिकार क्षमता निश्चितच स्वागतार्ह आणि अभिमानास्पद आहे.

प्रा. डॉ. विजय ककडे दीर्घकालीन गुंतवणूक संधी भारतातच असल्याने भारतीय बाजारातून विदेशी गुंतवणूकदार संस्था पलायन करत नाहीत, हे स्पष्ट होते. भारतीय भांडवल बाजाराची ही सकारात्मक आणि शक्तिमान वैशिष्ट्ये छोट्या गुंतवणूकदारांना संधी देत असतात. या एकूण घटनेचा अर्थ व अन्वयार्थ महत्त्वाचा ठरतो. यानंतर सेन्सेक्सने ८० हजारांची पातळी तोडून खाली गेलेला बाजार दुपारच्या सत्रात व्ही शेप उसळी घेत पुन्हा ८०,६२३.२६ च्या पातळीवर स्थिरावला. जागतिक बाजारपेठेत युद्ध, धोरण गोंधळ यांच्या जोडीला येणारी अनिश्चितता बाजार दिशा भरकटण्यास कारणीभूत ठरत असते. अंतर्गत घटकदेखील महत्त्वपूर्ण ठरतात. खरे तर, अशा संकटाच्या वेळी देशाच्या विकास क्षमतेचा, गुंतवणूक शक्यतांचा कस लागत असतो. एप्रिल २०२५ मध्ये 'बाजार स्थिती आणि दिशा' या अहवालात भारतीय बाजार सक्षमता किंवा जागतिक व्यापार महायुद्धात पडझड न होता का टिकून आहे, हे स्पष्ट केले आहे. यामध्ये उपयोगिता सेवा क्षेत्र १५.५ टक्के दराने, तर भांडवली वस्तू निर्देशांक १३.५ टक्के, आरोग्य क्षेत्र ८.५ टक्के आणि वित्त सेवा ८ टक्क्यांनी वाढत असल्याने निप्टीने ५.३ टक्क्यांची (वार्षिक) वाढ नोंदवली. यातही मध्यम आणि छोट्या कंपन्यांचा निप्टी मिडकॅप १०.२ आणि स्मॉलकॅप ११.९ टक्क्यांनी वाढला. हे सर्व भारताची अर्थव्यवस्था मृत असल्याचे म्हणणार्यांना सज्जड पुरावा देते. पाश्चात्त्य देशांच्या तुलनेत बि-क्स देश वेगाने विकसित होत आहेत. नॅसडॅक (संयुक्त दर्शक) ८.२ टक्क्यांनी घसरला, तर भारताचा आंतरराष्ट्रीय भांडवल इंडेक्स ९.२ टक्क्यांनी वाढला, असे 'मॉर्गन स्टॅन्ले'ची आकडेवारी दर्शवते.

बाजार हा अंधपणे मूल्यमापन करत असतो आणि कोणासही सवलत अथवा शिक्षा देत नाही. ज्याची अंतर्गत क्षमता उत्तम, वर्धिष्णू असते त्याला हिरवा झेंडा मिळतोच. भारताबाबत हेच प्रकर्षाने दिसून येत आहे. भारत ही मृत अर्थव्यवस्था, असे म्हटल्यावर त्याच आठवड्यात आयपीओसाठी २.५ लाख कोटी भारतीय गुंतवणूकदार हा भारत असल्याचा संदेश देणारे आहेत. प्रचंड मोठी आणि वेगाने वाढणारी भारतीय अर्थव्यवस्था आहे. भारतातील मध्यमवर्गीयांचे वाढते उत्पन्न आणि उंचावणारे जीवनमान दरवर्षी ४ लाख मोटारी खरेदी करत आहे. वित्तीय शिस्त, पोषक आणि लवचिक पतधोरण, व्यापार, उद्योग याबाबतचे सकारात्मक धोरण हे सर्व घटक असल्याने आपली विकासगंगा दीर्घकाळासाठी फायदा देणारी ठरेल. भारतीय गुंतवणूक क्षेत्र एसआयपीमार्फत सातत्यपूर्ण योगदान देत असून, बाजार स्थिरतेत हा खारीचा वाटा मोठा आहे. २०१६-१७ मध्ये केवळ ४३ हजार कोटी रुपयांची वार्षिक एसआयपी आता ३ लाख कोटी रुपयांचा टप्पा पार करून पुढे जात असून, जीएसटीपेक्षा अधिक भर टाकत आहे. सक्षम भविष्याचा बचतीतून पाया घालणारे हे सर्व एसआयपी देणारे महत्त्वपूर्ण ठरतात. त्याच्या उत्तम व्यवस्थापनातून १५ ते २० टक्के आणि व काही योजनांतून ३५ टक्के परतावा दिला आहे.

अमेरिकेने भारतीय मालासाठी जकात दर २५ टक्क्यांऐवजी ५० टक्के करण्याचा विचार बाजारात अल्पकालीन प्रतिक्रिया अत्यंत संथपणे आणि डोकेदुखी न देणारा ठरला. शेअर बाजार दुपारच्या सत्रानंतर व्ही आकाराची भरपाई देत वाढला. हे धक्के आपणास शिस्त न सोडता उत्तम शेअर्सची एसआयपी करण्यासाठी अधिक योग्य ठरेल. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर भारत केवळ स्वतंत्रच नाही, तर अनेक हादरे, हल्ले, परतावून लावतो, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. ट्रम्प यांच्या एकांगी आणि दबावखोर धोरणास शांतपणे उत्तर देत आहोत हीच आपल्या देशाची क्षमता आहे, हे निश्चित!आंतरबँक चलन बाजारात डॉलरच्या तुलनेत रुपया ५ पैशांनी वधारून ८७.६७ वर पोहोचला. परकीय गुंतवणुकीचा स्थिर ओघ आणि डॉलर निर्देशांकातील नरमाई, यामुळे रुपयाला बळकटी मिळाली. बाजारात सुरुवातीला झालेल्या घसरणीनंतर, गुंतवणूकदारांनी कमी झालेल्या किमतीत दर्जेदार शेअर्स खरेदी करण्याची संधी साधली. विशेषतः, ऑटो, फार्मा, आणि आयटी क्षेत्रातील शेअर्समध्ये मोठ्या प्रमाणात खरेदी दिसून आली, ज्यामुळे बाजारात चौफेर सुधारणा झाली.

भारतीय शेअर बाजारात गुंतवणूकदारांनी एक नाट्यमय चढ-उतार अनुभवला. सुरुवातीच्या सत्रात झालेल्या मोठ्या घसरणीनंतर, शेवटच्या तासात झालेल्या जोरदार खरेदीमुळे बाजाराने सर्व नुकसान भरून काढले आशियातील प्रमुख शेअर बाजारांमध्ये तेजीचे वातावरण होते. दक्षिण कोरियाचा कोस्पी, जपानचा निक्केई २२५, शांघाय कंपोझिट आणि हाँगकाँगचा हँग सेंग हे सर्व निर्देशांक वाढीसह बंद झाले. बुधवारी अमेरिकेचे बाजारही सकारात्मक पातळीवर बंद झाले होते आणि वॉल स्ट्रीट फ्युचर्समधील तेजीने देशांतर्गत बाजाराला आधार दिला. एकंदरीत, सुरुवातीच्या धक्क्यानंतर बाजाराने दाखवलेली लवचिकता गुंतवणूकदारांचा वाढलेला आत्मविश्वास दर्शवते. आगामी काळात जागतिक घडामोडी आणि व्यापार वाटाघाटींवर बाजाराची पुढील दिशा अवलंबून असेल.

तज्ज्ञांच्या मते, दोन्ही देशांमध्ये वाटाघाटींसाठी अजूनही संधी उपलब्ध आहे, ज्यामुळे बाजाराला मोठा आधार मिळाला. वाटाघाटींसाठी अजूनही २० दिवसांची मुदत आहे आणि २४ ऑगस्ट रोजी अमेरिकेचे एक व्यापारी शिष्टमंडळ भारत दौर्यावर येण्याची शक्यता आहे. याच कारणामुळे बाजारातील घसरण थांबली. अमेरिकेच्या शुल्कवाढीच्या घोषणेमुळे सुरुवातीला बाजारावर दबाव होता; पण दिवसाच्या अखेरीस आंतरराष्ट्रीयस्तरावर शांतता चर्चेची शक्यता निर्माण झाल्याने आणि अमेरिकेच्या भूमिकेत नरमाई येण्याच्या आशेने बाजाराचे वातावरण सुधारले, हे विशेष! गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेली घसरण थांबवत गुरुवारी भारतीय शेअर बाजारात शेवटच्या क्षणी खरेदी दिसून आली. यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टीत वाढ नोंदवली गेली, ज्यामुळे गुंतवणूकदारांना दिलासा मिळाला.

# मतदार याद्यांचा घोळ

बिहारमध्ये सध्या मतदार याद्यांच्या गहन पुनरीक्षणाचा विषय फारच ताणला गेला आहे. इंडिया आघाडीतील सर्वच विरोधी पक्षांनी हा विषय गेले जवळपास पंधरा दिवस संसदेतही लावून धरला आहे. तेथे रोजच त्यावरून निदर्शने सुरू आहेत. सभागृह सुरू झाले की तेथे त्यावरून फलक फडकवले जातात आणि गदारोळ करून कामकाज बंद पाडले जाते, एकदा कामकाज तहकूब झाल्यानंतर विरोधी पक्षांची खासदार मंडळी सभागृहातले फलक पुन्हा बाहेर येऊन फडकवतात आणि घोषणाबाजी करतात, हे चित्र संसद अधिवेशन सुरू झाल्यापासूनचे आहे. त्यांना संसदेत यावर चर्चा हवी आहे, पण सरकार चर्चेला अनुमती देत नाही. सरकारने असा पवित्रा घेतला आहे की मतदार याद्यांचे पुनरीक्षण हा विषय निवडणूक आयोगाच्या अखत्यारीत येतो, त्याच्याशी सरकारचा संबंध नाही. त्यामुळे संसदेत त्यावर चर्चा करता येणार नाही. सरकारचा हा आव साळसूदपणाचा आहे आणि त्यांचे म्हणणे असे की संसदेत यावर चर्चा करायला अनुमती जरी दिली तरी त्या चर्चेला कोणत्या खात्याचा मंत्री उत्तर देणार? कारण हा विषय कोणत्याच खात्याच्या अंतर्गत येत नाही, अशीही सरकारची भूमिका आहे. पण त्यावर विरोधी पक्षही हार मानायला तयार नाहीत. त्यांना कोणत्याही परिस्थितीत या विषयावर संसदेत चर्चा हवीच आहे. मध्यंतरी अशी एक बातमी उठवली गेली होती की, सरकारने या पेचप्रसंगावर तोडगा म्हणून निवडणूक प्रक्रियेतील सुधारणा या विषयावर सभागृहात चर्चा घडवून आणण्याचे संकेत दिले आहेत. मग निवडणूक प्रक्रियेतील या चर्चेत बिहारमधील सध्याच्या एसआयआर विषयावरसुद्धा विरोधक आपली मते मांडू शकतील असा एक मधला मार्ग काढायचा निर्णय सरकारने घेतला आहे, असे सूचित केले गेले.



पण ती बातमीसुद्धा खरी नव्हती. कारण सरकारने अधिकृतपणे तसा प्रस्तावच मांडलेला नाही. त्यामुळे हा पेचप्रसंग मंगळवारी पण कायम होता. जर बिहारमधील मतदार याद्यांच्या दुरुस्तीच्या कामात मोठ्या प्रमाणावर घोळ झाला आहे असा जर विरोधकांचा आरोप असेल तर त्यावर चर्चा करायला काय अडचण आहे हे समजत नाही. संसद हे देशातल्या सगळ्याच महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठीचे व्यासपीठ आहे आणि निवडणूक प्रक्रिया ही लोकशाहीचा मूलभूत आधार आहे. त्या प्रक्रियेविषयीच विरोधी पक्ष साशंक असेल, तर हा विषय केवळ निवडणूक आयोगाचा आहे असे सांगून सरकारला हात झटकता येणार नाही. बिहारमध्ये नव्याने जी मतदार यादी तयार केली जात आहे त्यातील सुमारे ६५ लाख मतदार वगळले गेले आहेत आणि ही यादी आता सर्व मतदारांसाठी आणि राजकीय पक्षांसाठी खुली करण्यात आली आहे. त्या यादीत पात्र मतदारांची नावे आहेत की नाही हे तपासून तक्रारी दाखल करण्याचे आवाहन निवडणूक आयोगाने केले आहे आणि त्यासाठी महिनाभराची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर ही मतदार यादी अंतिम केली जाणार आहे. केवळ दोन महिन्याच्या अवधीत कोट्यवधी मतदारांच्या पुनरीक्षणाचा हा विषय का रेटून नेला जात आहे आणि ऐन निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरच ही प्रक्रिया का केली जात आहे हा विरोधकांचा मुख्य आक्षेपाचा मुद्दा आहे. आयोगाने बिहारमध्ये नव्याने जी मतदार यादी तयार केली आहे त्यातही प्रचंड गोंधळ आहे, अनेक मृत मतदारांची नावे त्यात समाविष्ट आहेत, अनेक हयात मतदारांची नावे त्यातून वगळली गेली आहेत.

प्रत्येक राज्यातील निवडणुका आल्या की तेथे बांगलादेशी घुसखोरांची मोठी संख्या असल्याचा दावा केला जातो, बिहारमध्येही तसाच दावा केला गेला होता; पण जी नवीन प्रारूप मतदार यादी जाहीर झाली आहे त्यात विदेशी मतदार आढळून आलेले नाहीत असे निदान निवडणूक आयोगाच्या निवेदनातून तरी स्पष्ट झाले आहे, पण या यादीतील बाकीचा जो घोळ आहे त्याचा मुद्दा कायम आहे. भारतीय जनता पक्षाने निवडणूक आयोगाची यंत्रणा हाताशी धरून त्यांना विरोध असलेल्या मतदारांची नावे यादीतून जाणीवपूर्वक वगळली आहेत असा विरोधी पक्षांचा नेमका आरोप आहे. पण हा आरोप भाजपकडून सातत्याने फेटाळून लावला गेला आहे. नुसता आरोप करणे आणि तो फेटाळून लावणे यातून मूळ समस्या संपत नाही.

त्यामुळे बिहारमधील एसआयआर प्रक्रियेच्या संबंधात लोकसभेत चर्चेला अनुमती देणे आणि दोन्ही पक्षाचे म्हणणे संसदेच्या व्यासपीठावरून लोकांपुढे मांडणे हाच एक सोयीचा मार्ग वाटतो आहे. त्यावर सरकारने विचार करायला हवा. हा विषय केवळ बिहारपुरता मर्यादित नाही तर तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि अन्य राज्यांशीही संबंधित आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीमध्ये लाखो लोकांची नावे समाविष्ट करणे किंवा लाखो लोकांची नावे अचानक काढून टाकणे हा संशयाला निमंत्रण देण्याचाच विषय आहे, त्यावर एकदाचा सोक्षमोक्ष लावणे गरजेचे आहे. त्यामुळे विरोधकांना यावर चर्चा हवी असेल, तर सरकारने त्यात आडकाठी करता कामा नये. मतदार यादीमध्ये कसा घोळ केला जातो याचे ठोस पुरावे उपलब्ध असल्याचा दावा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला असून येत्या आठ तारखेला हे पुरावे त्यांनी जनतेपुढे उघड करायचे ठरवले आहे, आम्ही जो गौप्यस्फोट करू तो अणुबॉम्बच्या क्षमतेचा आहे आणि त्यानंतर देशातील निवडणूक आयोग गायब होईल अशी आव्हानात्मक भाषा ही राहुल गांधी यांनी केली आहे, त्यामुळे एकूणच हा विषय आता निर्णायक पातळीवर येऊन ठेपला आहे.

# 'निसार'रूपी गरुडझेप


भारत-अमेरिका संयुक्त सहकार्यातून साकारलेला निसार उपग्रह ही एक नवी उपलब्धी आहे. प्रगत अभियांत्रिकी तंत्रज्ञानातील उच्च गुणवत्तेचे शिखर आहे. हा उपग्रह पृथ्वीच्या भूपृष्ठावरील सर्व हालचालींचा आलेख आपल्या समोर ठेवेल. उपग्रह क्षेत्रातील भारताचा हा सर्वात मोठा शक्तिशाली प्रयोग असून, त्यामुळे अंतराळ क्षेत्रांतील भारताचे वर्चस्व अमेरिकेनेसुद्धा मान्य केले आहे, असा याचा अर्थ होतो.

प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर पृथ्वीच्या पोटातील हालचालींचे मापन करून भावी संकटांची सूचना देणार्या निसार उपग्रहाचा अर्थ मोठा मौलिक आहे. निसार शब्दाचा विस्तार असा होतो की, 'नासा-इस्रो सायंटिफिक सिंथेटिक अपर्चर रडार'. या उपग्रह मोहिमेच्या माध्यमातून निसर्ग क्रिया-प्रक्रियांचे मापन केले जाणार आहे. त्यामुळे याला निसर्ग उपग्रह असेही म्हटले आहे. ३० जुलै रोजी श्रीहरीकोटा येथून प्रक्षेपित झालेला हा उपग्रह भारत-अमेरिका यांच्यातील अंतराळात सहकार्यातून प्रक्षेपित झाला आहे. हा अनोखा उपग्रह इमेजिंग क्षेत्रात मोठी क्रांती करणारा ठरेल. कॅलिफोर्नियातील जेट प्रयोगशाळेचे वैज्ञानिक पॉल रोसेन यांच्या मते उच्च वैज्ञानिक महत्त्वाकांक्षेतून एक प्रभावी जीवनरक्षक प्रणाली उदयास आली आहे.

विज्ञानातील अनुप्रयोग आणि प्रगत जीवनदृष्टीचा हा आविष्कार आहे. हवामान बदलाच्या संकटांतून उभ्या मानव जातीला वाचविण्यासाठी हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. दुहेरी स्वरूपाच्या म्हणजेच ड्युअल बँड रडारमुळे या उपग्रहाद्वारे पृथ्वीच्या पृष्ठभागाचे मिलिमीटरनुसार अचूकपणे निरीक्षण करता येईल, तसेच त्यामुळे भूखंडांतील हालचाली, टेक्टॉनिक शिफ्ट, हिमनद्यांच्या उलथापालथी, जैववनस्पती, बायोमास बदल आणि भूस्खलन, सागराच्या अंतरंगातील हालचाली याबाबत अचूक निदान करणे शक्य होईल. पृथ्वीच्या आणि सागराच्या हालचालींबाबत आपण उत्तम थ्रिडी चित्रपटही या आधारे निर्माण करू शकतो. दोन तरंग लहरी एकापेक्षा अधिक अचूक मापन देऊ शकतील. या उपग्रहाला पृथ्वीची एक प्रदक्षिणा करण्यास ९७ मिनिटे लागतात, तर १२ दिवसांत सर्व सातही समुद्रांचे चित्रण हा उपग्रह करू शकेल.

उपग्रह क्षेत्रातील भारताचा हा सर्वात मोठा शक्तिशाली प्रयोग असून, त्यामुळे अंतराळ क्षेत्रातील भारताचे वर्चस्व अमेरिकेनेसुद्धा मान्य केले आहे, असा याचा अर्थ होतो. निसारमध्ये दोन प्रमुख पेलोड आहेत. एक 'नासा'ने विकसित केलेला आणि दुसरा 'इस्रो'ने विकसित केलेला. दोघेही तुल्यबळ असून, समसमान आहेत. नासा-इस्रो सिंथेटिक अपर्चर रडार सेटेलाईट म्हणजे निसार हा एक निरीक्षण उपग्रह आहे. आजवरचा हा सर्वात खर्चिक आणि महागडा असा हा उपग्रह आहे. त्यावर उभय राष्ट्रांचा १.३ अब्ज डॉर्ल एवढा खर्च होत आहे; पण त्याचे अनेकविध लाभ पाहता हा खर्च मानव जातीच्या कल्याणासाठी होत आहे, हे तेवढेच खरे आहे. भूकंप आणि त्सुनामी, हिमनद्यांच्या हालचाली तसेच धुळीचे वादळ, प्रचंड वेगाने येणारे हरिकेन, कार्बन उत्सर्जन आणि शोषणामुळे निर्माण होणार्या समस्या या सर्व बाबतीत या उपग्रहामुळे संकटांची जाणीव होईल आणि प्रश्न सोडवणे अधिक सोपे जाईल.

'इस्रो'चे अध्यक्ष संचालक डॉ. व्ही. नारायण यांनी म्हटल्याप्रमाणे हा उपग्रह एक जीवनरक्षक उपग्रह म्हणून ओळखला जाईल. अंतराळ संशोधन क्षेत्रात भारताच्या वाढत्या नेतृत्वाचे हा उपग्रह प्रतीक बनला आहे. स्वदेशी क्रायोजेनिक स्टेजसह जी.एस.एल.व्ही. या यानाचे हे नवे ऑपरेशनल उड्डाण आहे. सूर्य समकालिक ध्रुवीय कक्षेत उपग्रह जीएसएलव्हीचा वापर करणारे हे पहिलेच मिशन आहे. एक जीवनरक्षक उपग्रह म्हणून याचे महत्त्व तीन कारणांमुळे अधिक आहे. पहिले कारण म्हणजे, या उपग्रहामुळे मानव जातीवर येणार्या संभाव्य नैसर्गिक संकटांची आधीच चाहूल लागेल आणि शेकडो लोकांचे प्राण त्यामुळे वाचविले जातील. दुसरे म्हणजे, भूकंप, त्सुनामी, वादळे आणि भूस्खलन तसेच मोठमोठ्या भूमिपटलांचे स्थलांतर यांसारख्या आपत्तींची पूर्वसूचना मिळेल आणि जीवन सुरक्षित करता येऊ शकेल. तिसरे म्हणजे, या उपग्रहामुळे पृथ्वीच्या अंतरंगात होणारे बदल अभ्यासता येतील तसेच समुद्राच्या पोटात होणार्या हालचाली, हिमनद्यांचे बदलणारे प्रवाह यासारख्या दुर्घटनांचेसुद्धा चित्रण होईल आणि त्यापासून बोध घेता येऊ शकेल. मानवी जीवनाची नैसर्गिक संकटांतून मुक्तता करण्यात विश्वमानव समाजाला यश येईल, ही खरोखर मोठी उपलब्धी होय. हा उपग्रह शिपिंग मार्ग तसेच हवाई वाहतूक सुरक्षा यासाठीसुद्धा पथदर्शक आणि हितकारक ठरणार आहे.



'इस्रो' आणि 'नासा' यांनी संयुक्तपणे विकसित केलेला हा प्रकल्प १.५ अब्ज डॉलर्स एवढ्या खर्चाचा आहे. विशेषतः भारताने अंतराळ क्षेत्रात घेतलेली ही मोठी झेप एवढी विलक्षण आहे की, त्यामुळे सबंध जगाला त्याचे मानवी कल्याणाच्या दृष्टीने अनेक विविध लाभ होणार आहेत. असे लाभ लक्षात घेता या बहुउद्देशीय उपग्रहाचा प्रामुख्याने दुहेरी फायदा आहे. पहिले म्हणजे, त्यामुळे नैसर्गिक आपत्तींचे स्वरूप आणि त्याची भयावहता आधीच लक्षात येईल आणि जीवित तसेच वित्तहानी त्यामुळे टाळता येऊ शकेल. दुसरे म्हणजे, या उपग्रहामुळे वैज्ञानिक जगतामध्ये संशोधनासाठी सामग्री डेटा उपलब्ध करणे शक्य होईल आणि पृथ्वीच्या अंतरंगात होणार्या हालचाली या शास्त्रीय पद्धतीने अभ्यासता येतील. भारतीय आणि अमेरिकन अभियांत्रिकीचे हे उत्कृष्ट आणि अखंड मिशन होय. भविष्यातसुद्धा ही आदान-प्रदानाची क्रिया अखंडपणे चालू राहील. 'नासा'च्या जेट प्रोफेशन लॅबोरेटरी तसेच बंगळूरमधील 'इस्रो'च्या यू.आर.एस.सी. उपग्रह केंद्र तसेच 'नासा'च्या अहमदाबाद येथील स्पेस ॲप्लिकेशन सेंटरमध्ये हा उपग्रह विकसित करण्यात आला आहे. भारतीय उपग्रह यंत्रणेने आपली विश्वासार्हता पुन्हा एकदा जगासमोर सिद्ध केली आहे.

या उपग्रहाला बारा मीटर उंचीच्या न फडफडणार्या सोन्याचा जाळीदार अँटेना आहे. तो पृथ्वीच्या खालच्या कक्षात अशा प्रकारचा सर्वात मोठा अँटेना आहे. त्यामुळे हे एक प्रगत आणि स्वयंपूर्ण तंत्रज्ञान बनले आहे.

प्रक्रिया केल्यानंतर सर्व डेटा सार्वजनिकपणे उपलब्ध होईल आणि त्यामुळे सर्व संशोधन करणे शक्य होईल. ही एक मोठी उपलब्धी आहे. तांत्रिक आणि सांस्कृतिक दृष्टीने समृद्ध असा वारसा त्यामुळे तयार होईल. या दोन्ही संस्थांची विचारशैली वेगवेगळी असली, तरीही त्यांनी एकत्र येऊन समांतर पद्धतीने काम केले. त्यामुळे हा प्रकल्प नवी दिशा देऊ शकला आहे. चौरस किलोमीटरला डेटाने भागले असता फक्त दोन अमेरिकन सेंट एवढा खर्च होतो. म्हणजे 'नासा' व 'इस्रो'च्या भागीदारीमुळे हे शक्य झाले आहे. त्यामुळे या उपग्रहाला महागडा, खर्चिक असे म्हणणे रास्त ठरणार नाही. सर्व प्रकारच्या अभियांत्रिकी आव्हानांना सामोरे जाऊन तांत्रिक दृष्टीने परिपूर्ण अशी निर्मिती करण्यात उभयताना यश आले, हे अधोरेखित केले पाहिजे.

# अंड्याचा वापर न करता सकाळच्या नाश्त्यासाठी झटपट बनवा केळीचे पॅनकेक, मोठ्यांनाही आवडेल पदार्थ

सकाळच्या नाश्त्यात नेहमीच ठराविक पदार्थ खाण्याचा सगळ्यांचं कंटाळा येतो. नाश्त्यात प्रत्येकाला काहींना काही चमचमीत आणि हेल्दी पदार्थ खाण्यास हवे असतात. नाश्त्यात कांदापोहे, उपमा, शिरा किंवा डोसा खाऊन कंटाळा येतो. अशावेळी नाश्त्यात नेमकं काय बनवावं? हा प्रश्न सर्वच महिलांना पडतो. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला सकाळच्या नाश्त्यात अंड्याचा वापर न करता केळीची पॅनकेक बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. केळी खाणे आरोग्यासाठी आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. यामध्ये असलेल्या घटकांमुळे शरीराला ऊर्जा मिळते. याशिवाय पॅनकेक तुम्ही लहान मुलांच्या डब्यात किंवा बाहेर फिरायला जाताना घेऊन जाऊ शकता. बऱ्याचदा लहान मुलांना केळी खायला आवडत नाही. चवीला गोड असलेली केळी अनेक लोक खात नाहीत. अशावेळी तुम्ही पॅनकेक किंवा इतर पदार्थ बनवून मुलांना खाण्यास देऊ शकता. चला तर जाणून घेऊया रेसिपी.



साहित्य:
केळी
मैदा
साखर
बेकिंग सोडा
दूध
मीठ
बटर

कृती:


केळी पॅनकेक बनवण्यासाठी सर्वप्रथम, केळीची साल काढून बारीक तुकडे करा आणि चमच्याने केळी मॅश करून घ्या.

मोठ्या वाटीमध्ये मॅश केलेली केळी, मैदा आणि चवीनुसार मीठ टाकून व्यवस्थित मिक्स करून घ्या.

नंतर त्यात तुमच्या आवडीनुसार पिठीसाखर आणि बेकिंग सोडा टाका. हे सर्वच साहित्य मिक्स करून झाल्यानंतर त्यात दूध टाकून पॅनकेकचे मिश्रण तयार करा.

तवा गरम झाल्यानंतर त्यात बटर टाका आणि वरून पॅनकेकचे मिश्रण टाकून दोन्ही बाजूने भाजून घ्या. तयार आहेत सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले केळी पॅनकेक. पॅनकेक सर्व्ह करताना वरून त्यावर मध टाकावे.

# बंद नाक होईल मोकळे! 'हे' आयुर्वेदिक उपाय करून तात्काळ मिळवा आराम, सर्दी- खोकला होईल दूर





पावसाळ्याच्या दिवसांमध्ये वातावरणात सतत काहींना काही बदल होत असतात. कधी ऊन तर कधी पाऊस पडत आहे. याचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये साथीचे आजार मोठ्या प्रमाणावर वाढू लागतात. सर्दी, खोकला, ताप, उलट्या, जुलाब इत्यादी अनेक समस्या वाढू लागल्यानंतर शरीराची रोगप्रतिकारशक्ती अतिशय कमकुवत होऊन जाते. त्यामुळे आरोग्याची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. बऱ्याचदा बाहेरील जंक फूडचे किंवा रस्त्यावरील स्टोलमध्ये ठेवलेले पदार्थ खाल्यामुळे पोट पूर्णपणे बिघडून जाते. हल्ली लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंतसगळेच सर्दी, खोकल्याच्या समस्येने त्रस्त आहेत. वारंवार खोकला आल्यामुळे मेंदूच्या नसांवर ताण येतो, ज्यामुळे डोकं दुखणे किंवा इतरही समस्या उद्भवू लागतात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला सर्दी, खोकल्यापासून कायमचा आराम मिळवण्यासाठी कोणते घरगुती उपाय करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. वाफ घ्यावी: नाक बंद होणे, सर्दी होणे, नाकातून पाणी येणे, घशात खवखव इत्यादी आरोग्यासंबंधित समस्या वाढू लागल्यानंतर शरीराला हानी पोहचते. रोगप्रतिकारशक्ती कमकुवत झाल्यानंतर वारंवार थकवा किंवा अशक्तपणा जाणवतो. त्यामुळे खोकला आणि सर्दीपासून आराम मिळवण्यासाठी वाफ घ्यावी. वाफ घेल्यामुळे छातीमध्ये सुकलेला कफ मोकळा होण्यास मदत होते. गरम पाण्यात ओवा, तमालपत्र, काळीमिरी पावडर टाकून पाणी गरम करा. गरम पाण्याची ५ ते १० मिनिट वाफ घेतल्यानंतर सर्दी कमी होण्यास मदत होईल. वाफ घेताना डोक्यावर टॉवेल ठेवून वाफ घ्यावी.

वाफ घेतल्यामुळे शरीराला होणारे फायदे: आयुर्वेदिक गुणधर्मांनी समृद्ध असलेला ओवा आणि काळीमिरी पावडर आरोग्यासाठी अतिशय प्रभावी आहे. यामध्ये असलेले गुणधर्म सर्दी खोकल्यापासून तात्काळ आराम मिळवून देतात. सर्दी खोकला वाढल्यानंतर बऱ्याचदा डॉक्टरांच्या गोळ्यांनी सर्दी लगेच सुकून जाते पण कफ छातीमध्ये तसाच साचून राहतो. ज्यामुळे छातीमध्ये वेदना होणे, छाती भरून आल्यासारखे वाटणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात.

सर्दी खोकल्यावर प्रभावी उपाय: सर्दी खोकला किंवा नाक बंद झाल्यानंतर घरगुती उपाय करावे. घरगुती उपाय आरोग्यासाठी अतिशय प्रभावी ठरतात. यासाठी तुळशीची पाने अतिशय गुणकारी ठरतील. गरम पाण्यात तुळशीची पाने, ओवा, काळे मीठ आणि यूकेलिप्टस ऑइल टाकून पाणी गरम करून घ्या. पाणी गरम झाल्यानंतर डोक्यावर टॉवेल ठेवून १० मिनिट पाण्याची वाफ घ्यावी. यामुळे सर्दी, खोकला आणि आरोग्यासंबंधित समस्यांपासून आराम मिळेल.

F-Qs (संबंधित प्रश्न)

चेहऱ्यासाठी वाफ घेण्याचे फायदे:

वाफ त्वचेवरील छिद्र उघडते आणि त्वचेतील घाण, तेल आणि मृत पेशी काढून टाकते, ज्यामुळे त्वचा स्वच्छ आणि चमकदार दिसते. वाफेमुळे त्वचेतील रक्ताभिसरण सुधारते, ज्यामुळे त्वचेला ऑक्सिजन आणि पोषक तत्वांचा पुरवठा चांगला होतो, असे एका आरोग्य वेबसाइटने म्हटले आहे.

सर्दी, खोकला आणि कफासाठी वाफ घेण्याचे फायदे:

गरम पाण्याची वाफ घेतल्याने श्वासनलिका मोकळी होते आणि सर्दी, खोकला आणि कफ कमी होतो. वाफेमुळे कफ पातळ होतो, ज्यामुळे तो शरीरातून बाहेर काढणे सोपे होते.

वाफ घेताना काय काळजी घ्यावी:

चेहऱ्याला जास्त जवळून वाफ घेऊ नये, कारण त्यामुळे त्वचेला इजा होऊ शकते. गरम पाण्याची वाफ घेताना डोळे बंद ठेवावेत.

# आठवडाभर नियमित केसांना लावा कांद्याचा रस! केसांच्या सर्व समस्या होतील कायमच्या गायब





मागील अनेक वर्षांपासून केसांसंबधित समस्या मोठ्या प्रमाणावर वाढू लागल्या आहेत. ज्याप्रमाणे रुग्णालयात किडनी, लिव्हर आणि हृदयाच्या आजाराचे रुग्ण आहेत. तसेच त्वचा आणि केसांसंबधित समस्यांनी त्रस्त असलेले रुग्ण वाढले आहेत. हल्ली महिलांसह पुरुषांमध्ये सुद्धा केसांच्या समस्या मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. पुरुषांचे केस गळून हळूहळू टक्कल पडू लागते. केसांमध्ये पडलेले टक्कल काहीवेळा आत्मविश्वास पूर्णपणे कमी करून टाकतो. त्यामुळे केसांच्या आरोग्याची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. केस गळण्यास सुरुवात झाल्यानंतर अनेक लोक नेहमीच दुर्लक्ष करतात, पण सतत दुर्लक्ष केल्यामुळे केसांची गुणवत्ता पूर्णपणे खराब होऊन जाते. केसांच्या वाढीसाठी बाजारात अनेक वेगवेगळ्या महागड्या ट्रीटमेंट सुद्धा आहेत. या ट्रीटमेंट केल्यामुळे काहीकाळ केस अतिशय सुंदर आणि चमकदार दिसू लागतात. केसांच्या वाढीसाठी बाजारातील महागड्या ट्रीटमेंट घेण्याऐवजी घरगुती उपाय करून केसांची योग्य काळजी घ्यावी. केसांच्या वाढीसाठी अतिशय प्रभावी मानला जाणारा पदार्थ म्हणजे कांदा. जेवणातील सर्वच पदार्थ बनवताना कांद्याचा वापर केला जातो. याशिवाय जेवताना सुद्धा अनेक लोक कच्च्या कांद्याचे सेवन करतात. कांद्याचा रस केसांना लावल्यामुळे केस गळती थांबते. यासोबत केसांच्या मुलांना मुळांना पोषण मिळते. केसांच्या वाढीसाठी आणि केसांच्या समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी कायमच घरगुती उपाय करावे. यामुळे केसांमध्ये वाढलेला कोंडासुद्धा कमी होतो. आज आम्ही तुम्हाला केसांना कांद्याचे तेल लावल्यामुळे नेमके काय काय फायदे होतात, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.

पांढरे केस काळे होतात: हल्ली कमी वयातच अनेकांचे केस पांढरे होऊ लागले आहेत. पोषक घटकांचा अभाव आणि अपुऱ्या झोपेचा परिणाम केसांवर लगेच दिसून येतो. ज्यामुळे बऱ्याचदा शरीरात पोषक घटकांची कमतरता जाणवते. अशावेळी कांद्याच्या रसाचा वापर केसांसाठी करावा. कांद्याच्या रसात कॅटालेज नावाचे एंझाइम आढळून येते, जे केसांमधील हायड्रोजन पॅरॉक्साइडला तोडून टाकते. ज्यामुळे हळूहळू केस पांढरे होतात. अशावेळी कांद्याच्या रसाचा वापर करावा. यामुळे केस काळे होण्यास मदत होते. केस मजबूत होतात: शरीरात पोषक घटकांचा अभाव निर्माण झाल्यानंतर केस अचानक तुटणे, केस गळणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. या समस्या उद्भवू लागल्यास कांद्याच्या रसात खोबरेल तेल मिक्स करून लावावे.

यामुळे केसांच्या मुळांना पोषण मिळते आणि केस मजबूत होतात. महागड्या हेअर ट्रीटमेंट करताना वापरले जाणारे केराटिन प्रोटीन सल्फर बनवले जाते. त्यामुळे आठवड्यातून दोनदा केसांना कांद्याचा रस लावावा.

# वजन वाढतंय पण तोंडाचे चोचले पुरवायचेत? मग घरी बनव चविष्ट आणि कुरकुरीत असा Diet Chivda

सध्याच्या जगात अनेकांना लठ्ठपणाची समस्या सतावत आहे. वाढत्या वजनावर नियंत्रण मिळवण्यासाठी अनेकजण डाएटचा पर्याय निवडतात पण अरबट चरबट खाण्याची इच्छा काही डाएट करू देत नाही. अशात तोंडाचे चोचले देखील पुरवले तर पाहिजेत म्हणूनच आज आम्ही तुमच्यासाठी एक चविष्ट आणि हेल्दी असा पदार्थ घेऊन आलो आहोत. आजच्या आपल्या रेसिपीचे नाव आहे डाएट चिवडा! डाएट करणाऱ्यांसाठी चव आणि आरोग्य यामधील तोल साधणं थोडं कठीण असतं. पण जर तुम्हाला खमंग, कुरकुरीत आणि हलका नाश्ता हवा असेल तर डाएट चिवडा हा एक उत्तम पर्याय आहे. या चिवड्यामध्ये तळलेले साहित्य न वापरता कमी तेलात भाजलेले पोहे, डाळी आणि सुकामेवा वापरला जातो. त्यामुळे तो चविष्ट असूनही पचनास हलका आणि आरोग्यास लाभदायक असतो. हा चिवडा तुम्ही संध्याकाळच्या चहासोबत किंवा मधल्या वेळेस खाऊ शकता. चला जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती. साहित्य: पातळ पोहे - २ कप मूग डाळ - २ टेबलस्पून चणा डाळ - २ टेबलस्पून शेंगदाणे - २ टेबलस्पून बदाम/काजू (इच्छेनुसार) - १ टेबलस्पून कोरडी खोबऱ्याच्या काप - १ टेबलस्पून हिरव्या मिरच्या - २ (चिरून) कढीपत्ता - ८-१० पाने हळद - ञ टीस्पून साखर - ट टीस्पून मीठ - चवीनुसार जिरं - ट टीस्पून हिंग - एक चिमूट ऑलिव्ह ऑईल / कोकोनट ऑईल / तूप - १ ते १ट टेबलस्पून कृती: यासाठी सर्वप्रथम एका मोठ्या, जाड बुडाच्या कढईत पातळ पोहे मध्यम आचेवर कोरडे खरपूस भाजून घ्या. ते कुरकुरीत झाले की बाजूला काढा. त्याच कढईत थोडं तेल टाकून शेंगदाणे खरपूस परतून घ्या आणि काढा. आता त्याच तेलात मूग डाळ आणि चणा डाळ थोडीशी कुरकुरीत होईपर्यंत परतून घ्या. खोबरं, बदाम/काजू आणि हिरव्या मिरच्या, कढीपत्ता पण हलकं परतून घ्या. सर्व परतलेलं साहित्य एका मोठ्या भांड्यात मिसळा. आता त्यात भाजलेले पोहे, हळद, साखर, हिंग, मीठ आणि जिरं टाका. सगळं एकत्र नीट मिक्स करा. चिवडा थंड होऊ द्या आणि एअरटाइट डब्यात भरून ठेवा. तुम्ही यामध्ये ड्राय फ्रूट्स आपल्या आवडीनुसार वाढवू शकता. हा चिवडा २-३ आठवडे साठवून ठेवला जातो. ऑईल कमी वापरल्यामुळे तो डाएटसाठी योग्य आहे. F-Qs (संबंधित प्रश्न) डाएट चिवडा काय आहे? हा एक नाश्ता आहे

# तोंडात टाकताच विरघळणारे गोड मोतीचूर लाडू घरी कसे तयार करायचे? गोड सणाची गोड रेसिपी!



यंदा ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाचा सण साजरा केला जाणार आहे. बहीण-भावाच्या नात्याला समर्पित हा दिवस हिंदू धर्मातील एक खास सण आहे. आता सण म्हटलं की आपल्या घरी गोडाचे पदार्थ हे आलेच बहुतेकवेळी आपण हे पदार्थ बाहेरून खरेदी करतो पण मिठाईच्या दुकानातून विकत घेतलेले हे पदार्थ नेहमीच फ्रेश असतात असे नाही अशात हे पदार्थ घरीच बनवलेले बरे भारतीय मिठाईमध्ये मोतीचूर लाडू हे एक खास स्थान असलेले पारंपरिक आणि लोकप्रिय गोड पदार्थ आहे.

सण-उत्सव, विवाह समारंभ किंवा पूजेच्या प्रसंगी मोतीचूर लाडवांशिवाय गोडाचं पूर्णत्व होत नाही. हे लाडू छोटे, सुंदर मोत्यांसारख्या बूँदीपासून बनवले जातात, म्हणूनच यांना मोतीचूर लाडू म्हणतात. हे लाडू सौम्य सुवासिक, मऊसर आणि तोंडात वितळणारे असतात. अनेकांना हे लाडू खायला फार आवडता. हे लाडू घरीच बनवून तुम्ही घरातील सर्वांनाच खुश करू शकता, शिवाय हे लाडू बनवायला अगदी सोपे आहेत ज्यामुळे यासाठी तुम्हाला फार मेहनत घेण्याचीही गरज नाही. चला तर मग लगेच जाणून घेऊया मोतीचूर लाडू बनवण्यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य: बेसन (हरबरा पीठ) - १ कप

पाणी - सुमारे ठ कप (उेपीळींशपलू साठी आवश्यकतेनुसार) केशरी/ऑरेंज फूड कलर - थोडासा (ऐच्छिक)

तेल/तूप - तळण्यासाठी बूँदी करायची झारी (छिद्र असलेली झारा) साखर - १ कप पाणी - ट कप वेलदोड्याची पूड - ट टीस्पून केशर - काही धागे (ऐच्छिक) गुलाब जल / केवडा जल - ट टीस्पून (ऐच्छिक) तूप - २ टेबलस्पून बदाम/पिस्ता - सजावटीसाठी (ऐच्छिक) कृती: यासाठी सर्वप्रथम एका भांड्यात बेसन, थोडं फूड कलर आणि पाणी घालून मध्यम घट्टसर पीठ तयार करा. त्यात गाठी नसाव्यात याची काळजी घ्या. एका खोलगट कढईत तेल गरम करा. झाऱ्यावर पीठ ओतून छोटे छोटे थेंब गरम तेलात सोडा. बूँदी हलकी खरपूस झाली की बाहेर काढा. सगळी बूँदी अशीच तयार करा. एका पातेल्यात साखर व पाणी एकत्र करून मध्यम आचेवर १ तार पाक होईपर्यंत उकळा. त्यात वेलदोडा पूड, केशर आणि गुलाब जल घाला. तळलेली बूँदी तयार साखर पाकात घालून १०-१५ मिनिटं मुरू द्या. बूँदी थोडी थंड झाली की त्यात तूप घालून नीट मिक्स करा. मग हातावर थोडं तूप लावून मध्यम आकाराचे लाडू वळा. वरील बाजूस बदाम/पिस्ता लावून सजवा. लाडू वळताना मिश्रण फार गरम किंवा खूप थंड नसावं. बूँदी योग्य आकाराची यावी यासाठी झाऱ्याची निवड योग्य करा. साखर पाकात थोडा केशर घातल्यास रंग आणि चव दोन्ही वाढते.

# रात्री जेवणानंतर गोड पदार्थ खाण्याची इच्छा झाल्यास सोप्या पद्धतीमध्ये बनवा Saffron Fruit Custard, नोट करा रेसिपी





निरोगी राहण्यासाठी आहारात वेगवेगळ्या फळांचे सेवन केले जाते. फळे खाल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. बऱ्याचदा काहींना रात्री जेवल्यानंतर आईस्क्रीम, गोड पान किंवा काहींना काही गोड पदार्थ खाण्याची सवय असते. गोड पदार्थ खाल्याशिवाय झोपच येत नाही. मात्र नेहमीच रात्रीच्या जेवणानंतर गोड पदार्थ खाणे आरोग्यासाठी चांगले नाही. गोड पदार्थांमध्ये असलेल्या अतिरिक्त साखरेमुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढण्याची जास्त शक्यता असते. मधुमेह किंवा आरोग्यासंबंधित इतर गंभीर समस्या उद्भवू शकतात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला रात्रीच्या जेवणांतर केशर फ्रुट कस्टर्ड बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. फळांचा वापर करून बनवलेला पदार्थ चवीला अतिशय सुंदर लागतो. याशिवाय फळांचे कस्टर्ड लगेच तयार होते. हा पदार्थ तुम्ही सकाळी किंवा दुपारी बनवून फ्रिजमध्ये सेट करण्यासाठी ठेवू शकता. चला तर जाणून घेऊया फ्रुट कस्टर्ड बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:
दूध
कस्टर्ड पावडर
साखर
केशर
वेलची पावडर
फळे
सुका मेवा

कृती:

केशर फ्रुट कस्टर्ड बनवण्यासाठी सर्वप्रथम, कढईमध्ये दूध गरम करण्यासाठी ठेवा. दुधाला व्यवस्थित उकळी येईपर्यंत दूध मंद आचेवर ठेवून द्या.

दुधाला व्यवस्थित उकळी आल्यानंतर आवडीनुसार साखर टाकून व्यवस्थित मिक्स करा.

त्यानंतर त्यात केशर काड्या आणि वेलची पावडर घालून मिक्स करा.

वाटीमध्ये चमचाभर कस्टर्ड पावडर टाकून पातळ पेस्ट तयार करा. तयार केलेली पेस्ट गरम दुधात मिक्स करा.

त्यानंतर हळूहळू दूध घट्ट होण्यास सुरुवात होईल. तयार केलेले कस्टर्ड वाटीमध्ये काढून घ्या.

तयार केलेले कस्टर्ड फ्रिजमध्ये थंड होण्यासाठी ठेवा. २ तासांनंतर त्यात कापून घेतलेली फळे मिक्स करून खाण्यासाठी सर्व्ह करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले केशर फ्रुट कस्टर्ड.

# टिफिन रेसिपी! पराठ्याला द्या टेस्टी टच, नाश्त्यासाठी झटपट बनवा चिली गार्लिक पराठा; लहान मुलेही होतील खुश





पराठा हा भारतीयांच्या घराघरात बनणारा एक लोकप्रिय आणि सर्वांच्या आवडीचा नाश्ता आहे. पराठा हा अनेक प्रकारे बनवला जातो. जसे की, बटाट्याचा पराठा, मेथी पराठा, कोबी पराठा पण आज मात्र आम्ही तुमच्यासाठी एका हटके पराठ्याची रेसिपी घेऊन आलो आहोत जी तुम्हाला नक्कीच खूप आवडेल. कोणतीही स्टफिंग न घालता तुम्ही मिरची आणि लसूण घालून एक चविष्ट असा चिली गार्लिक पराठा तयार करू शकतो. हा पराठा चवीला अप्रतिम लागतो आणि कमी वेळेत झटपट बनून तयारही होतो.

पराठ्याला दिलेला हा हटके टच लहान मुलांना खायला खूप आवडेल. तेच तेच बोरिंग पराठे खाऊन कंटाळा आला असेल तर ही नवी रेसिपी नक्की ट्राय करू पाहा. लसणाचा सुगंध आणि मसालेदार चव या पराठ्याला आणखीन खास बनवते. तुम्ही सकाळच्या नाश्त्यासाठी किंवा मुलांच्या टिफिनसाठी हा पराठा तयार करू शकता. चला जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य:

गव्हाचे पीठ - २ कप

मीठ - ट टीस्पून

तेल - १ टेबलस्पून

पाणी - गरजेप्रमाणे

बारीक चिरलेला लसूण - १.५ टेबलस्पून

ताजी हिरवी मिरची (बारीक चिरलेली) - १

लाल तिखट - १ टीस्पून

चिल्ली फ्लेक्स - १ टीस्पून

बारीक चिरलेली कोथिंबीर - २ टेबलस्पून

जिरे पावडर - ट टीस्पून

मीठ - चवीनुसार

तेल - १ टीस्पून कृती:

चिली गार्लिक पराठा बनवण्यासाठी सर्वप्रथम एका बाऊलमध्ये गव्हाचे पीठ, मीठ आणि तेल घालून त्यात थोडं थोडं पाणी घालून मऊ पीठ मळा आणि झाकून १५-२० मिनिटं बाजूला ठेवून द्या.

एका पॅनमध्ये १ टीस्पून तेल गरम करून त्यात लसूण परतवा

लसूण हलकासा ब्राऊन झाल्यावर त्यात हिरवी मिरची, लाल तिखट, चिल्ली फ्लेक्स, जिरे पावडर आणि मीठ घालून १-२ मिनिटं परता

नंतर गॅस बंद करून कोथिंबीर घालून मिश्रण थंड होऊ द्या.

पीठाचे समान गोळे करून त्याच्या छोट्या पुऱ्या लाटा

एका पुरीवर स्टफिंग ठेवून दुसरी पुरी त्यावर ठेवून कडा बंद करा आणि हलक्या हाताने पराठा लाटा. या ट्रिकने

पराठा बनवल्यास तुमचा पराठा फाटणार नाही.

तवा गरम करून त्यावर पराठा शेकताना वरून तेल/लोणी लावा. दोन्ही बाजूंनी छान कुरकुरीत आणि सोनेरी रंग येईपर्यंत पराठा भाजा.

गरमागरम चिली गार्लिक पराठा दही, लोणचं किंवा मिरचीच्या ठेच्यासोबत सर्व्ह करा.

यामध्ये किसलेलं चीज घालून 'चीज चिली गार्लिक पराठा' देखील बनवू शकता.

# तुमच्या दिव्यांग पाल्यासाठी अधिक वेळ आणि प्रेम द्या.. डॉ. क्लेलिआ किरण पाउलोस

लातूर :– राष्ट्रीय बौध्दिक दिव्यांग सशक्तीकरण संस्था क्षेत्रीय कार्यालय, मुंबई, (NIEPID Regional Center, Mumbai), सक्षम लातूर, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र लातूर कार्यान्वित अभिकृता: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती महाराष्ट्र प्रांत संचलित संवेदना प्रकल्प, हरंगुळ (बु) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बौद्धिक दिव्यांग पाल्यांच्या पालकांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. आपले अपत्य दिव्यांग आहे याचे वाईट वाटून न घेता त्याच्यावर चांगले संस्कार करा, त्याच्यासाठी भरपूर वेळ आणि प्रेम द्या म्हणजे तुमचे अपत्य प्रगती तर करेलच पण तुमच्या मनावर असलेला ताण दूर होईल. याच बरोबर दिवसभरात वेळ काढून थोडा वेळ योगासने आणि प्राणायाम केलात तर तुमचा दिवस आनंदात जाईल असे डॉ. क्लेलिआ किरण पाउलोस यांनी पालक आणि दिव्यांग बालकांसमोर बोलतांना आपले विचार व्यक्त केले. डॉ. क्लेलिआ किरण पाउलोस या राष्ट्रीय बौध्दिक दिव्यांग सशक्तीकरण संस्था क्षेत्रीय कार्यालय, मुंबई सेंटर में मुंबई येथे डॉ स्करण पावलस या सायकोलॉजिस्ट म्हणून कार्यरत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संवेदना प्रकल्याचे मा. अध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि पाहुण्यांचा परिचय जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे समिती सदस्य श्री सुरज बाजुळगे यांनी केले. विशेष शिक्षिका सौ शीतल सूर्यवंशी यांनी शीघ्र निदान व उपचार केल्यास दिव्यांगत्वाची तीव्रता कमी होऊ शकते असे मत व्यक्त केले. श्री. सुरज बाजुळगे यांनी दिव्यांगांसाठी लागणारे ओळख पत्र UDID चे महत्व सांगितले. 'जिव्हाळा' या पालकांच्या संघटनेबद्दल जिव्हाळा पालक संस्था, लातूरच्या सचिव तथा महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या राज्य सचिव सौ. सुमित्रा तोटे यांनी सविस्तर माहिती





दिली. या प्रसंगी आहारतज्ञ डॉ. शोभा जगदिश अग्रोया यांनी 'दिव्यांग मुलांचा आहार कसा असावा' याबाबत सखोल मार्गदर्शन केले आणि पालकांच्या प्रश्नांना उत्तरेही दिली: दिव्यांग मुले पाणी कमी पितात यावर बोलतांना डॉ. अग्रोया म्हणाल्या की, पाण्यात ग्लुकॉन – डी पावडर अथवा मध मिसळून पाणी पिण्यास द्यावे त्यामुळे ही मुले पाणी योग्य प्रमाणात पितील. श्री बस्वराज पैके यांनी निरामय आरोग्य विमा व रेल्वे पास बाबतची माहिती पालकांना दिली. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने पालक आणि संवेदना प्रकल्प संस्थापक कार्यवाह श्री सुरेशदादा पाटील, जिल्हा दिव्यांग पुनवर्सन केंद्र लातूरच्य प्रकल्प समितीचे सदस्य श्री विलास आराध्ये, श्री वैजनाथ व्हणाळे उपास्थित होते. श्री संतोष कोळगावे यांनी आभार मानले आणि कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या २ दिवसाच्या शिबिरामध्ये लातूर जिल्ह्यातील एकूण ३२ दिव्यांगांची बुध्यांक तपासणी व ६० पालकांचे समुपदेशन करण्यात आले.

# तुमच्या दिव्यांग पाल्यासाठी अधिक वेळ आणि प्रेम द्या.. डॉ. क्लेलिआ किरण पाउलोस

लातूर :– राष्ट्रीय बौध्दिक दिव्यांग सशक्तीकरण संस्था क्षेत्रीय कार्यालय, मुंबई, (छखएझखऊ ठशसळेपरश्र उशपींशी, चींलरळ), सक्षम लातूर, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र लातूर कार्यान्वित अभिकृता: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती महाराष्ट्र प्रांत संचलित संवेदना प्रकल्प, हरंगुळ (बु) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बौद्धिक दिव्यांग पाल्यांच्या पालकांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. आपले अपत्य दिव्यांग आहे याचे वाईट वाटून न घेता त्याच्यावर चांगले संस्कार करा, त्याच्यासाठी भरपूर वेळ आणि प्रेम द्या म्हणजे तुमचे अपत्य प्रगती तर करेलच पण तुमच्या मनावर असलेला ताण दूर होईल. याच बरोबर दिवसभरात वेळ काढून थोडा वेळ योगासने आणि प्राणायाम केलात तर तुमचा दिवस आनंदात जाईल असे डॉ. क्लेलिआ किरण पाउलोस यांनी पालक आणि दिव्यांग बालकांसमोर बोलतांना आपले विचार व्यक्त केले. डॉ. क्लेलिआ किरण पाउलोस या राष्ट्रीय बौध्दिक दिव्यांग सशक्तीकरण संस्था क्षेत्रीय कार्यालय, मुंबई सेंटर में मुंबई येथे डॉ स्करण पावलस या सायकोलॉजिस्ट म्हणून कार्यरत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संवेदना प्रकल्याचे मा. अध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि पाहुण्यांचा परिचय जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे समिती सदस्य श्री सुरज बाजुळगे यांनी केले.





विशेष शिक्षिका सौ शीतल सूर्यवंशी यांनी शीघ्र निदान व उपचार केल्यास दिव्यांगत्वाची तीव्रता कमी होऊ शकते असे मत व्यक्त केले. श्री. सुरज बाजुळगे यांनी दिव्यांगांसाठी लागणारे ओळख पत्र णऊखऊ चे महत्व सांगितले. 'जिव्हाळा' या पालकांच्या संघटनेबद्दल जिव्हाळा पालक संस्था, लातूरच्या सचिव तथा महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या राज्य सचिव सौ. सुमित्रा तोटे यांनी सविस्तर माहिती दिली. या प्रसंगी आहारतज्ञ डॉ. शोभा जगदिश अग्रोया यांनी 'दिव्यांग मुलांचा आहार कसा असावा' याबाबत सखोल मार्गदर्शन केले आणि पालकांच्या प्रश्नांना उत्तरेही दिली: दिव्यांग मुले पाणी कमी पितात यावर बोलतांना डॉ. अग्रोया म्हणाल्या की, पाण्यात ग्लुकॉन – डी पावडर अथवा मध मिसळून पाणी पिण्यास द्यावे त्यामुळे ही मुले पाणी योग्य प्रमाणात पितील. श्री बस्वराज पैके यांनी निरामय आरोग्य विमा व रेल्वे पास बाबतची माहिती पालकांना दिली. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने पालक आणि संवेदना प्रकल्प संस्थापक कार्यवाह श्री सुरेशदादा पाटील, जिल्हा दिव्यांग पुनवर्सन केंद्र लातूरच्य प्रकल्प समितीचे सदस्य श्री विलास आराध्ये, श्री वैजनाथ व्हणाळे उपास्थित होते. श्री संतोष कोळगावे यांनी आभार मानले आणि कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या २ दिवसाच्या शिबिरामध्ये लातूर जिल्ह्यातील एकूण ३२ दिव्यांगांची बुध्यांक तपासणी व ६० पालकांचे समुपदेशन करण्यात आले.

# महा–ई सेवा केंद्र व सीएससी सेंटरच्या माध्यमातून होणारी शेतकर्यांची लूट तात्काळ थांबवावी –माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर



लातूर दि.०८–०८–२०२५ लातूर जिल्ह्यातील शेतकर्यांची पिक विमा भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. यासाठी १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत तारीख वाढवून दिली असल्यामुळे शेतकर्यांनी फार्मर आयडी काढून पिक विमा भरण्याच्या प्रक्रियेला वेग दिलेला आहे. परंतु फार्मसी आयडी काढणे व पिकविमा भरण्याच्या नावाखाली शेतकर्यांकडून आव्वाच्या सव्वा रक्कम घेऊन शेतकर्यांची मोठ्या प्रमाणात लूट केली जात आहे. त्यामुळे महा–ई सेवा केंद्र व सीएससी केंद्राच्या माध्यमातून होणारी शेतकर्यांची लूट थांबवून यातील दोषी केंद्र चालकावर कार्यवाही करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी लातूरच्या जिल्हाधिकारी यांना दिलेले आहे.

लातूर जिल्ह्यातील शेतकर्यांना फार्मर आयडी काढणे व पिकविमा भरण्याकरीता तसेच शालेय विद्यार्थ्यांना विविध प्रमाणपत्र काढण्याकरीता महा–ई सेवा केंद्र व सीएससी सेंटरवर शासनामार्फत लॉग इन करण्याची प्रक्रिया दिलेली आहे. सदरील सेवा ही अल्पदरात जनतेला द्यावयाची असताना देखील लातूर जिल्ह्यातील महा–ई सेवा केंद्र व सीएससी केंद्राच्या माध्यमातून शेतकरी व सर्वसामान्य विद्यार्थ्यांकडून अव्वाच्या सव्वा फिस आकारून त्यांची लूट मोठ्या प्रमाणात केली जात आहे. असाच प्रकार शहरातील एका केंद्रावर झाला असल्याचे समोर आलेले आहे. त्यामुळे खर्या अर्थाने अशा या मनमानी केंद्र धारकांकडून शेतकरी, विद्यार्थी व सर्वसमान्य नागरिकांची लूट मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व केंद्राची चौकशी करून सर्व सामान्यांची लूट करणार्या केंद्रचालकावर कार्यवाही करावी. तसेच विविध प्रमाणपत्राकरीता आकारण्यात येणारा माफक दर दर्शनीय भागात लावून होणारी शेतकरी, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांची लूट थांबविण्यात यावी, अशी मागणीही या निवेदनात करण्यात आलेली आहे.

# पिंपरड येथील खदानीतील ब्लास्टींगमुळे घरांना तडे तहसिलदारांकडे निवेदनातून नुकसान भरपाईची मागणी

यवतमाळ/ प्रतिनिधी :– झरीजामणी:मुकुटबन या छोट्या शहरालगत असलेल्या पिंपरड शिवारात खदानीतील ब्लास्टींगमुळे घरांना दररोज प्रचंड हादरे बसतात. पिंपरड गावातील नागरिक भयभीत झाले आहे. या ब्लास्टींगमुळे भविष्यात विपरीत परिणाम होण्याची शक्यता वाढली आहे. मुकुटबनपासून काही अंतरावर असलेल्या पिंपरड परिसरात मोठ्या प्रमाणात खदान सुरु करण्यात आल्या आहे. त्यात आर.सी.पी.एल या कंपनीने याच परिसरात प्लांट सुरु केला आहे. याठिकाणी प्रचंड प्रमाणात




ब्लास्टींग होत आहे. प्रचंड प्रमाणात होणा–या ब्लास्टमुळे येथील घरांना जोरदार हादरे बसतात. त्यामुळे अनेक घरांना तडे गेले. स्फोटाच्या आवाजाचा नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. लहान बालके, ज्येष्ठ नागरिकांच्या प्रकृतीवर मोठा परिणाम होत आहे. या प्रचंड प्रमाणातील स्फोटामुळे मोठ्या प्रमाणात घरांना हादरे बसले. त्यामुळे घरांना तडे गेले आहेत. दररोज होणा–या स्फोटाच्या आवाजामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहेत. खदानीत संबंधित कंपनी दररोज ब्लास्ट करतात. या ब्लास्टच्या स्फोटामुळे प्रचंड आवाज होतो आणि मोठा हादरा बसतो. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून पिंपरड येथील नागरिक भयभीत झाले आहे. त्यांना अनर्थ घडण्याची चिंता सतावत आहे. घरांना तडे जात असल्याने घरे पडण्याची शक्यताही बळावली आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या सर्व समस्यांच्या अनुषंगाने पिंपरड येथील नागरिकांनी तहसिलदारांना निवेदन देऊन सरसकट नुकसान भरपाईची मागणी केली आहे. तर यावर तहसिलदांरांकडून संबंधित कंपनीची चौकशी करून ब्लॉस्टींगवर लगाम लावतील का? नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई मिळतील का? याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# आपल्यावर खोटे आरोप करणाऱ्यांवर अब्रू नुकसानीचा तसेच खंडणीचा गुन्हा दाखल करणार : डॉ. विश्वास कुलकर्णी

लातूर : आपल्या रुग्णालयात किडनी स्टोनच्या कारणावरून दाखल झालेल्या रुग्णाने व त्याच्या निकटवर्तीयांनी आपल्यावर शुक्रवारी लातुरात जे खोटे आरोप केले आहेत, त्यांच्यावर आपण अब्रू नुकसानीचा तसेच खंडणीचा गुन्हा दाखल करणार असल्याची माहिती लातूरचे ख्यातनाम मूत्र विकार तज्ज्ञ डॉ. विश्वास कुलकर्णी यांनी शुक्रवारी ( दि. ८ ऑगस्ट ) सायंकाळी लातुरात पत्रकारांशी बोलताना दिली.

लातुरातील एका प्रतिष्ठित वैद्यकीय व्यावसायिकांवर करण्यात आलेल्या खोट्या आरोपांचे खंडन करण्याच्या उद्देशाने लातूर इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत डॉ. विश्वास कुलकर्णी बोलत होते. आपण ही पत्रकार परिषद आपल्यावर खोटे आरोप केल्याच्या कारणावरून घेत नसून आपली या संदर्भातील वास्तव भूमिका प्रसार माध्यमांच्या समोर विशद करण्यासाठी घेत असल्याचे त्यांनी सुरुवातीलाच स्पष्ट केले. या प्रकरणात आपल्यावर आरोप केलेल्या रुग्णावर आपल्याच रुग्णालयात किडनी स्टोन ची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली होती. सदर रुग्णाच्या किडनीच्या ५ सेंमी . आकाराचा खडा निघाला होता. शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णाच्या सर्व आवश्यक त्या चाचण्या व तपासण्याही करण्यात आल्या होत्या. त्याचे सगळे रिपोर्टस उपलब्ध आहेत. किडनीतील खडा मोठा असल्यामुळे त्याच्या किडनीची कार्यक्षमता तपासण्यासाठी आम्ही युएसजी व आयव्हीपी तपासण्या केल्या असता किडनी खराब असल्याचे निदर्शनास आले. ही बाब रुग्ण व त्याच्या नातेवाईकांच्या कानावर घालण्यात आली. त्यांच्या संमतीने किडनी



काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. कोणत्याही रुग्णाच्या शरीरातील एखादा अवयव काढायचा असेल तर रुग्ण, त्याच्या नातेवाईकांची पूर्वपरवानगी आवश्यक असते. या रुग्णाची तसेच त्याच्या नातेवाईकांची इंग्रजी व मराठी भाषेत रीतसर पूर्वपरवानगी घेतली गेली. त्यावर रुग्ण व त्याच्या कुटुंबियांच्या सह्याही आहेत. आज संबंधित रुग्णाची प्रकृती ठणठणीत आहे. रुग्ण व त्याच्या निकटवर्तीयांनी या प्रकरणी आपल्याकडून पैसे लाटण्याच्या अनुषंगाने हा प्रकार केला असल्याचा स्पष्ट आरोपही डॉ. कुलकर्णी यांनी केला.

शस्त्रक्रियेनंतर काही मंडळींच्या सांगण्यावरून सदरील रुग्ण व त्याच्या निकटवर्तीयांकडून आपल्याविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल करण्याचाही प्रकार झाला. पोलिसांनी त्या रुग्णावर करण्यात आलेल्या उपचार व शस्त्रक्रियेसंदर्भातील सर्व कागदपत्रे पाहिल्यानंतर ही केस बंद करून टाकली होती.

# सरकारने आयकर विधेयक २०२५ मागे घेतले

नवी दिल्ली : केंद्र सरकारने फेब्रुवारी २०२५ मध्ये नवीन आयकर विधेयक आणले होते. मात्र, आता आज हे विधेयक मागे घेण्यात आले आहे. फेब्रुवारीमध्ये लोकसभेत मांडल्यानंतर ते विधेयक निवड समितीकडे पाठवण्यात आले होते. निवड समितीच्या सर्व सूचना स्वीकारल्यानंतर, आता सरकार एक नवीन विधेयक आणणार आहे असे म्हटले होते. केंद्र सरकारने १३ फेब्रुवारी २०२५ रोजी लोकसभेत हे नवीन विधेयक सादर केले आणि त्याच दिवशी ते निवड समितीकडे छाननीसाठी पाठवले होते.

समितीने २२ जुलै २०२५ रोजी संसदेत आपला अहवाल सादर केला. या नवीन अपडेटेड विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळात मान्यता देण्यात आली. त्यानुसार, हे नवीन विधेयक सोमवारी (११ ऑगस्ट २०२५) लोकसभेत सादर केले जाणार होते. हे विधेयक ६ दशके जुने आयकर कायदा १९६१ ची जागा घेईल. भाजप खासदार बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीने त्याचा आढावा घेत अनेक सुधारणा केल्या असल्याची माहिती आहे.

नवीन प्राप्तिकर विधेयकाबाबत सर्वात मोठा प्रश्न स्लॅबबद्दल आहे. नवीन विधेयकात टॅक्स स्लॅब बदलण्याचा कोणताही प्रस्ताव नसल्याचे आयकर विभागाने स्पष्ट केले. दरम्यान विभागाच्या मते नवीन विधेयकाचा उद्देश भाषा सोपी करणे आणि अनावश्यक तरतुदी काढून टाकणे असा असल्याचे स्पष्ट करण्यात आले. संसदेतून मंजुरीनंतर विधेयक घेतले मागे अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज निवड समितीच्या अहवालानुसार प्राप्तिकर विधेयक, २०२५ मागे घेण्याची परवानगी मागितली.

# लातूर क्रेडाईचा वृक्ष लागवड संदेश राज्यभर–जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे २ हजार वृक्ष लागवडीचा जिल्हाधिकार्यांच्या हस्ते शुभारंभ

लातूर : लातूर हा राज्यातील अग्रेसर जिल्हा म्हणून ओळखला जातो. लातूरचा शैक्षणीक पॅटर्न तसेच सोयाबीन उत्पादक शेतकर्यांचा जिल्हा म्हणून नावारूपाला आला असताना लातूर क्रेडाईने वृक्ष लागवडीत एक नवा पॅटर्न निर्माण केला असून हा संदेश क्रेडाईच्या माध्यमातून राज्यभर पोहचवला आहे. लातूर क्रेडाईने यापुर्वी अनेक सामाजीक उपक्रमात भाग घेतला आहे. लातूर क्रेडाईच्या सदस्यांचे काम उल्लेखनीय असून वृक्ष लागवडीची सुरू असलेली चळवळ राज्यभर जाईल, असे मत लातूर क्रेडाई वृक्ष लागवड शुभारंभप्रसंगी केले.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मीना, महापालिका आयुक्त मानसी मिना, क्रेडाई महाराष्ट्रचे अध्यक्ष प्रफुल्ल तावरे, सहसचिव सुरेश भोईटे, महापालिका उपायुक्त देवीदास जाधव, अप्पर जिल्हाधिकारी करमरकर, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ आदी मान्यवरांची उपस्थित होती.

लातूर क्रेडाईच्या वतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांचा सत्कार क्रेडाई अध्यक्ष उदय पाटील तर वुमन विंगच्या समन्वयक सौ. रश्मी बेळंबे यांनी केला तर जिल्हा पोलीस अधीक्षक यांचा सत्कार विष्णू मदने, शशीकांत हिरेमठ यांनी केला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा सत्कार जगदीश कुलकर्णी व संतोष हत्ते यांनी केला तर महापालिका आयुक्त मानसी मीना यांचा सत्कार आशीष कामदार व सौ. देशपांडे महाराष्ट्र क्रेडाई अध्यक्ष प्रफुल्ल तावरे यांचा सत्कार लातूर क्रेडाई माजी अध्यक्ष सुबोध बेळंबे, दिपक कोटलवार यांनी केला.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी म्हणाल्या, निसर्ग हा आपल्याला ऑक्सीजन देतो. त्याला वाढ करण्याची व संगोपन करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. लातूर जिल्ह्यात वृक्ष लागवडीच्या माध्यमातून एक विशेष मोहीम राबविली जाणार असून या मोहिमेंतर्गत लक्ष रोपणाचा मेगा ड्राईव्ह आयोजीत केला जाणार असून लातूर जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने एक तरी झाड लावले पाहिजे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. लातूर क्रेडाईचे काम चांगले असून केडाई ही सामाजीक भान जपणारी संस्था आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE